# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,पुणे-०४

## * प्रकटन *

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षा व माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना खाजगीरित्या फॉर्म नं.१७ भरून परीक्षेस प्रविष्ट होण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

त्यानुसार फेब्रुवारी/मार्च २०२० च्या माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षेस खाजगीरित्या प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नावनोंदणी अर्ज (फॉर्म नं.१७) ऑनलाईन प्रक्रियेद्वारे स्विकारण्याचा कालावधी दिनांक २९/०७/२०१९ पासून ते दिनांक ३०/०९/२०१९ पर्यंत निश्चित करण्यात आला होता.

या बाबत आपणास सुचित करण्यात येते की, खाजगीरित्या इ.१० वी व इ.१२ वी साठी प्रविष्ट होणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव नोंदणी अर्ज विलंब व अतिविलंब शुल्काने ऑनलाईन पध्दतीने स्विकारण्याच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी / इंग्रजी मधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.

१. **इ.१० वी** व **इ.१२ वी खाजगी विद्यार्थी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन स्विकारण्याच्या** विलंब व अतिविलंबाच्या तारखा खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेले आहेत.

| अ.क्र | **विलंब शुल्क प्रती विद्यार्थी रूपये १००/- स्विकारून माध्यमिक शाळांनी ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इयत्ता १० वी)** | **विलंब शुल्क प्रती विद्यार्थी रूपये २५/- स्विकारून कनिष्ठ महाविद्यालयांनी ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा (इयत्ता १२ वी)** | **माध्यमिक शाळांनी /कनिष्ठ महाविद्यालयांनी अतिविलंब शुल्क प्रती विद्यार्थी रूपये २०/- प्रतिदिन स्विकारून विभागीय मंडळाकडे ऑनलाईन पध्दतीने नावनोंदणी अर्ज भरावयाच्या तारखा ( इ.१० वी व इ.१२ वी )** |
|---|---|---|---|
| १ | **सोमवार** दिनांक **१८/११/२०१९** ते **शुक्रवार** दिनांक **२९/११/२०१९** | **सोमवार** दिनांक **१८/११/२०१९** ते **शुक्रवार** दिनांक **२९/११/२०१९** | **शनिवार** दिनांक **३०/११/२०१९** ते **शनिवार** दिनांक **०७/१२/२०१९** |

२. खाजगी विद्यार्थ्यांनी इ.१० वी व इ.१२वी साठी नावनोंदणी अर्ज ऑनलाईन पध्दतीनेच भरावयाचे आहेत. त्यामुळे कोणाचाही ऑफलाईन अर्ज स्विकारला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

३. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी खालील वेबसाईटचा वापर करावा. अर्ज भरण्यासाठीच्या सूचना संकेतस्थळावर मराठी/इंग्रजीमधून उपलब्ध आहेत त्या वाचून अर्ज भरण्यास सुरूवात करावी.
**संकेतस्थळ- इयत्ता १० वी - http://form17.mh-ssc.ac.in**
**इयत्ता १२ वी - http://form17.mh-hsc.ac.in**

४. विद्यार्थ्यांने अर्ज भरण्याकरीता **१)** शाळा सोडल्याचा दाखला (मूळ प्रत), मूळप्रत नसल्यास व्दितीयप्रत व प्रतिज्ञापत्र किंवा महा ई-सेवा केंद्र सेतू मधून दुय्यम दाखला सादर करीत असलेबाबतचे प्रतिज्ञालेख **२)** मूळ मार्कशिट, व मूळ प्रमाणपत्र, **३)** आधारकार्ड ४) स्वत:चा सद्याचा पासपोर्ट आकारातील फोटो इत्यादी कागदपत्रे स्कॅन करुन अपलोड करावयाची आहेत.

५. कागदपत्रे स्कॅन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी स्कॅनर/मोबाईलव्दारे कागदपत्रांचे फोटो काढून ते अपलोड करावेत. **विद्यार्थ्यांचा त्यांचा ई-मेल आयडी व पुढील संपर्कासाठी मोबाईल क्रमांक अनिवार्य आहे.**

Letter /pawar

६. संपूर्ण अर्ज भरुन झाल्यावर भरलेल्या अर्जाची प्रत विद्यार्थ्याला त्याने अर्जात नमूद केलेल्या ई-मेल वर पाठविली जाणार आहे. तसेच या भरलेल्या संपूर्ण अर्जाची प्रिंटआउट, शुल्क पावती व हमीपत्र यासह दोन प्रतीत काढून घ्यावी.

७. विद्यार्थ्यांनी अर्जाची प्रिंटआउट , विहित शुल्क व मूळ कागदपत्रे नाव नोंदणी अर्जावर नमूद केलेल्या संपर्क शाळा/ कनिष्ठ महाविद्यालयामध्ये विहित मुदतीत जमा करावयाची आहेत.

८. खाजगी विद्यार्थ्यासाठी नावनोंदणी शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे-

**इ.१० वी - रू.१०००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

**इ.१२वी - रू.५००/- नोंदणी शुल्क + रू.१००/- प्रक्रिया शुल्क (processing fee)**

९. अ) माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१० वी ) परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांची नावनोंदणी ऑनलाईन होणार आहे. यामध्ये विद्यार्थ्यास त्याच्या पत्त्यानुसार व त्याने निवडलेल्या माध्यम निहाय संपर्क केंद्राची यादी दिसेल त्यापैकी एका संपर्क केद्राची निवड विद्यार्थ्यांने करावयाची आहे. या संपर्क केंद्राने प्रकल्प, प्रात्यक्षिक परीक्षा, तोंडी परीक्षा, अंतर्गत मूल्यमापन, श्रेणी विषयासंदर्भातील कामकाज करावयाचे आहे.

ब) उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खाजगी विद्यार्थ्यांनी नावनोंदणी ऑनलाईन करावयाची आहे. नावनोंदणी करताना विद्यार्थ्यांचा पत्ता, त्याने निवडलेली शाखा व माध्यम निहाय त्यास कनिष्ठ महाविद्यालयाची यादी दिसेल त्यामधील एका कनिष्ठ महाविद्यालयाची निवड विद्यार्थ्यांनी करावयाची आहे. या कनिष्ठ महाविद्यालयाव्दारे परीक्षा अर्ज, प्रकल्प, प्रात्यक्षिक/तोंडी श्रेणी परीक्षा दयावयाच्या आहेत.

१०. विहित शुल्क रोखीने शाळा/क.महाविद्यालयात जमा करावयाचे आहे. विद्यार्थ्यांनी संपर्क शाळा / कनिष्ठ महाविद्यालयांकडून अर्जासोबत दिलेल्या पावत्यांपैकी विद्यार्थ्यांसाठीच्या प्रतीवर स्वाक्षरी व शिक्का घेवून ती स्वत:कडे ठेवावी.

११. दिव्यांग विद्यार्थ्यांना खाजगीरित्या प्रविष्ट व्हायचे असेल तर त्यांनी त्यांच्या दिव्यांगत्वाचे जिल्हा शल्य चिकित्सकांच्या/ प्राधिकृत केलेल्या हॉस्पिटलच्या प्रमाणपत्राची छायाप्रत प्रमाणित करून अर्जासोबत सादर करावी. व आवश्यकतेनुसार विभागीय मंडळ /कनिष्ठ महाविद्यालय / संपर्क केंद्र यांचेकडून माहिती प्राप्त करून घ्यावी.

१२. ऑनलाईन अर्ज भरताना कोणतीही अडचण आल्यास कार्यालयीन वेळेत दुरध्वनी **क्र.०२०-२५७०५२०७/२५७०५२०८/२५७०५२७१** वर तांत्रिक बाबीसाठी संपर्क साधावा.

१३. विद्यार्थ्यांना नावनोंदणी प्रमाणपत्र ऑनलाईन देण्यात येणार आहे याची नोंद घ्यावी. तसेच विद्यार्थ्यांनी अर्जासोबत छाननीसाठी दिलेली मूळ कागदपत्रे संपर्क केंद्र/ कनिष्ठ महाविद्यालयांकडून निर्धारित कालावधीनंतर परत घेवून जाण्याची दक्षता घ्यावी.

१४. पात्र विद्यार्थ्यांना नाव नोंदणी ( EC ) प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्यांनी परीक्षेची आवेदनपत्रे (Examination form) मंडळाने विहित केलेल्या कालावधीत परीक्षा शुल्कासह भरणे आवश्यक आहे याची नोंद विद्यार्थ्यांनी घ्यावी.

दिनांक-१८/११/२०१९

( श्री. एस.एम.आवारी )
विभागीय सचिव,
कोल्हापुर विभागीय मंडळ,कोल्हापूर

Letter /pawar